शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे सायंदैनिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व  परुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
(खाजगी वितरण)
अंक जुलै २०२२
अंक क्र. ५१
Website : www.bhidekul.in
Email : office@bhidekul.in

वर्ष : 49 अंक : 69 कोल्हापूर सोमवार ता. 1 ऑगस्ट 2022 किंमत 4 रुपये ✲ पाने 4+12 Reg. No. KLR 136/21-23 Posted in Kolhapur RMS RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI

# सुवर्ण विशेषांक प्रकाशन - २०२२



समारंभप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले.



सुवर्ण अंकाचे प्रकाशन

दि. ८ मे, २०२२ रोजी प्रतिज्ञा हॉल, कर्वेनगर, पुणे येथे भिडे कुलाच्या 'आम्ही भिडे' ह्या मुखपत्राचे प्रकाशन जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष व संचालक श्री. अभयजी माटे यांच्या हस्ते मोठ्या दिमाखात पार पडले. कार्यक्रमाच्या सूत्रसंचालिका सौ. वीणाताई केळकर (भिडे) यांनी आलेल्या भिडे कुटुंबीयांचे स्वागत केले. प्रमुख पाहुणे श्रीमान अभय माटे व भिडे प्रतिष्ठानच्या मान्यवरांचे हस्ते दीप प्रज्ज्वलन होऊन कार्यक्रमास सुरुवात झाली.

गेली अनेक वर्षे रंगभूमीवर नाट्यकला सादर करणारे ज्येष्ठ नटवर्य श्री. रमेशराव भिडे, डोंबिवली ह्यांचा प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. शशिकुमार भिडे यांनी सन्मान केल्यानंतर श्री. रमेशरावांनी आपल्या खास शैलीत 'मी काशिनाथ घाणेकर' हा एकपात्री प्रयोग सादर केला. 'आम्ही भिडे' ह्या मुखपत्राचे संपादक श्री. प्रभाकरपंत भिडे यांनी प्रास्ताविक सादर करताना १९५३ साली पहिल्या भिडे कुलवृत्ताचे प्रकाशन साहित्यिक श्री. म. माटे यांच्या हस्ते झाले होते आणि आजच्या आम्ही भिडे च्या ५० व्या सुवर्ण विशेषांकाचे प्रकाशनसुद्धा श्री. अभय माटे यांच्या हस्ते होत आहे हा दुग्धशर्करा योग आहे असे सांगितले. तसेच २००३ मध्ये सांगली येथे झालेल्या भिडे संमेलनात 'आम्ही भिडे'चा पहिला अंक प्रकाशित झाला आणि ह्या संपूर्ण संमेलनाचे नियोजन प्रतिष्ठानचे मा. अध्यक्ष श्री. कुमार भिडे यांच्या नियोजनामुळे उत्तम झाले होते. गेली दोन ते अडीच वर्षे कोरोना महामारीच्या काळात सर्व कार्यक्रम व भेटीगाठी बंद झाल्या. सरकारी निर्बंध आले. त्यानंतर पुढील ५० व्या अंकाचे औचित्य साधून आपण सुवर्ण विशेषांकाचे प्रकाशन पुण्यात घेऊया ही संकल्पना कार्यकारी संपादक श्री. दिलीप भिडे यांनी मांडली. त्यानुसार हा अंक रंगीत, ७० ते ७२ पाने असलेला, वाचनीय व संस्मरणीय आणि संग्रही व्हावा ह्या उद्देशाने अंकाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने आपण एकत्र आले आहोत. त्यानंतर प्रमुख पाहुणे श्री. अभय माटे ह्यांचा सन्मान करून त्यांच्या हस्ते सुवर्ण विशेषांकाचे विमोचन झाले. ह्यानंतर सौ. वीणा केळकर ह्यांनी दिलेल्या शीतपेयाचा सर्वांनी आस्वाद घेतला.

'आम्ही भिडे' हा अंक भिडे कुटुंबीयांचे संपर्क माध्यम आहे. भिडे कुटुंबीयांनी लिहिते व्हावे, ह्या उद्देशाने तीन लेखन स्पर्धा घेतल्या. संमेलन, हळदीकुंकू, भोंडला व स्पर्धा इत्यादी कार्यक्रमांच्या निमित्ताने सर्वांना सहभागी होता यावे हा प्रमुख हेतू आहे. भिडे कुलवृत्ताची तिसरी आवृत्ती डिजिटलमध्ये करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. ही माहिती संगणकाद्वारे आपलेपर्यंत कशी पोचेल ह्यासाठीच्या सूचना व माहिती पुढील अंकात देत आहोत. ही माहिती देताना कार्यकारी संपादक दिलीप भिडे पुढे म्हणाले की अंकाबद्दलचा प्रतिसाद आपल्याकडून मिळणे अपेक्षित आहे. त्यामुळे अंकाबद्दल मिळालेल्या सूचनांच्या अनुषंगाने सुधारणा करता येतात. तसेच कौतुकाची थाप असेल तर आम्हा कार्यकर्त्यांची उत्साहवृद्धी होते हे विशेष नमूद केले. अंक वेळेवर आणि वाचनीय व्हावा ह्यासाठी संपादक मंडळ प्रयत्न करीत असते. त्यामुळे प्रतिसाद जरूर द्यावा ह्याचा पुन्हा विशेष उल्लेख केला. २०११ पासून गेली १० ते१२ वर्षे हा अंक नियमितपणे ज्या एजन्सीद्वारे आपण

**सूचना :** आजीव सभासद वर्गणी, देणगी, जाहिरात इत्यादी स्वरूपात रक्कम ऑनलाईन ट्रान्स्फर करण्यासाठी खालील माहिती -
**TJSB सहकारी बँक लि; सदाशिव पेठ शाखा, पुणे-30.**
**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान,**
अकौंट नंबर - 018110100001294,
IFSC Code - TJSB0000018
विशेष सूचना - रक्कम ट्रान्स्फर केल्यावर दिलीप भिडे, पुणे यांना 9657541236 या क्रमांकावर किंवा office@bhidekul.in ह्या मेलवर कळवावे म्हणजे पावती पाठवली जाईल.

**सोशल मिडियावर (उदा. फेसबुक, व्हॉट्सअॅप इ.) 'आम्ही भिडे' वा तत्सदृश नावाने काही ग्रुप असतील तर सदर ग्रुप नित्युंदन गोत्रिय भिडे प्रतिष्ठानचे अधिकृत नाहीत, ह्याची कृपया नोंद घ्यावी.**

आम्ही भिडे **अंक ५१ वा**

संपादक : श्री. प्रभाकर शंकर भिडे
कार्यकारी संपादक : श्री. दिलीप भिडे
संपादक मंडळ : ले. क. सुनिल भिडे, श्री. प्रदीप ज. भिडे, श्री. चिंतामणी भिडे, श्री. राजेंद्र भिडे, श्री. विनायक वि. भिडे, सौ. स्नेहल भिडे, श्री. माधव भिडे
सल्लागार मंडळ : श्री. सुनिल भिडे (अभिरूची) पुणे, सौ. गौरी प्र. भिडे (डोंबिवली) श्री. शंतनु नि. भिडे, के. मो. भिडे, सौ. मेघना भिडे श्रीमती सुमती वा. भिडे, डॉ. प्रतिभा भिडे
अक्षर जुळणी : सौ. विनीता डबीर

**पत्रव्यवहारासाठी पत्ता**
**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**
**१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,**
**पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०**
**मो. ९६२३०१७४४४**

मुंबई कार्यालय : **सौ. संपदा भिडे**
ए ५०३, श्रीसाई शारदा हौसिंग सोसायटी, भवानी शंकर रोड, दादर (पश्चिम), मुंबई - ४०० ०२८. मो. ९८१९९ ५१३९१

**सहवेदना :** भिडे कुलातील निधन झालेल्या ज्ञात-अज्ञात कुलबंधू, भगिनी आणि माहेरवाशिणींना भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमन अर्पण करीत आहे.
१) श्री. प्रदीप जगन्नाथ भिडे, अंधेरी, मुंबई

# अभिप्राय

- आपल्या भिडे कुलाच्या आम्ही भिडे मुखपत्राच्या ५० व्या सुवर्ण विशेषांकाच्या निमित्ताने आपल्या सर्व कार्यकर्त्यांना अनेक शुभेच्छा. ह्यानंतर हीरक महोत्सवी आणि त्यानंतर शतकपूर्ती अंकही चालू राहूदे. भिडे कुलाचा अंक असाच पिढ्यानपिढ्या सुरू राहील ही सदिच्छा !

  **- श्रीमती सुमती वा. भिडे,** कर्वेनगर, पुणे

- सुवर्ण विशेषांक मिळाला. अगत्याने पाठविल्याबद्दल धन्यवाद. अंक चांगला आहे. एखादी संस्था सलग, सक्षमपणे चालयिणे, लोकांना पिढ्यानपिढ्या जोडून ठेवणे, संमेलन भरवून बंधुभाव वाढविणे हे किती अवघड काम आहे हे मी जाणतो. त्यामुळे तुम्हा भिडे मंडळींचे हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा !

  **- अरुण गोडबोले,** सातरा

- आम्ही भिडे ५० व्या सुवर्ण अंकाचा प्रकाशन सोहळा उत्तम झाला, नियोजन अतिशय सुंदर होते. आपले हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा !

  **- राजेश भिडे आणि शरद पांडुरंग भिडे,** पुणे.

- सुंदर नियोजन आणि सर्वच सुंदर !

  **- विलास भिडे,** बोरिवली.

- खरं तर मला ह्या कार्यक्रमास येता आले नाही तरी पण फोटो बघून कार्यक्रमाचे नियोजन उत्तम होते हे वाचून आनंद झाला. सर्वांचे अभिनंदन !

  **- श्रीमती दिपाली दि. भिडे,** पुणे.

- दिलीप आणि भिडे मंडळींना नमस्कार. माझ्या मनात असून सुद्धा मी ८ मे च्या समारंभास येऊ शकलो नाही पण सर्व फोटो पाहून समाधान झाले

  **- सतीश जनार्दन भिडे,** गिरगांव, मुंबई.

- २४ मे, २००० रोजी भिडे प्रतिष्ठानच्या सोनेरी वाटचालीला सुरुवात होऊन २२ वर्षे पूर्ण होत आहेत. आम्ही भिडेचा ५० वा अंक म्हणून सुवर्ण विशेषांक प्रकाशित होत आहे ही आनंदाची बाब आहे. भिडे प्रतिष्ठानने हस्ताक्षर वर्ग, लेखन स्पर्धा, चैत्रातील हळदीकुंकू, भारतीय संस्कृतीचे प्रतीक दर्शविणारा भोंडला असे अनेक विविध उपक्रम सुरू केले. तसेच अमृत महोत्सव, सहस्रचंद्रदर्शनाचे औचित्य साधून ज्येष्ठांचे सत्कारही करत आहेत. उत्तरोत्तर प्रतिष्ठानची अशीच प्रगती होवो ही सदिच्छा ! **- श्रीमती उज्ज्वला बा. साठे,** कोथरुड, पुणे.

**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान विवाह वाढदिवसाच्या शुभेच्छा !**

**जुलै** सौ. नीला आणि श्री. नंदकुमार ताम्हणकर, सांगली ५-७-८०




१) उपस्थित भिडे मंडळी २) प्रमुख पाहुणे श्री. अभय माटे मार्गदर्शन करताना ३) सौ. व श्री. डबीर यांचा सन्मान ४) सौ. गौरी प्रदीप भिडे यांचा सन्मान

पाठवितो, त्या प्राजक्त एजन्सीचे मालक श्री. व सौ. डबीर, कोल्हापूर यांच्या सहकार्यामुळे हा अंक प्रतिष्ठानच्या बजेटमध्ये आणि चांगला होतो. त्यामुळे तो अंक यशस्वी होण्यात ह्या दाम्पत्याचे योगदान आहे. त्यायोगे त्यांचा सन्मान करण्यात आला.

प्रमुख पाहुणे श्री. अभय माटे बोलताना म्हणाले, 'माझे आजोळ हे भिड्यांकडेच आहे आणि माझे बालपण भिडे कुटुंबातच असल्यामुळे मी सुद्धा भिडे कुलाचा एक भाग आहे. त्या प्रेमापोटी हे निमंत्रण मी स्वीकारले. आम्ही भिडे हा अंक वाचनीय व विविधतेने नटलेला आहेच, तरीसुद्धा ह्या विविधतेपेक्षा सुद्धा मेजर जनरल संजय भिडे यांनी १०० पेक्षा अधिक अतिरेक्यांना कंठस्नान घातले आणि अतुलनीय असे शौर्य दाखवून देशसेवा व देशकार्याच्या माध्यमातून त्यांनी केलेल्या अभूतपूर्व पराक्रमाचे वर्णन विशेष भावले. अंकाचे वाचन करताना भिड्यांची सामाजिक बांधिलकीतून सेवा करणारी भिडे मंडळी पण दिसतात. समाजसेवेचे उगमस्थान व केंद्रस्थान कुटुंब असते. त्यामुळे आपल्या घरी कामाला येणाऱ्या व्यक्तीला मदत करण्यापासून सुद्धा ते करता येते. अगदी अंगणवाडी ते रक्तपेढीपर्यंत करता येते. परमेश्वराचे वर्णन 'अखंड मंडलाकारम' असे केले जाते. प्रतिष्ठानच्या माध्यमातून माणसे जोडून त्यांची सेवा, मदत करणे हे मुख्य आहे. आपण अतिरेक्यांना कंठस्नान घातले नाही, तरी ओढवलेल्या प्रसंगाचे मुकाबला करण्याचे धारिष्ट्य दाखविणे हेही एक कार्य आहे. त्यातूनच समाजपरिवर्तनाची दिशा मिळेल. तसेच ह्यातून मिळालेले अनुभव आपणाला येतात असे ह्या ओघवते व प्रेरणादायी, मुद्देसूद भाषणाने सर्व मंत्रमुग्ध झाले. अंकाचे कार्यकारी संपादक दिलीप भिडे यांचा सुवर्ण विशेषांकाचे औचित्य साधून पुष्पगुच्छ व गणपती प्रतिमा देऊन सन्मान करण्यात आला. प्रतिष्ठानच्या कोणत्याही कामामध्ये जबाबदारी घेऊन सक्रिय कार्य करणारी आणि ज्यांचे दोन्ही हात प्रत्येक कामात असतात अशा शब्दात सौ. संपदा भिडे यांनी आपल्या निवेदनात सांगितले. कार्यक्रमाला प्रसिद्ध कवी व गीतकार श्री. जयंतराव भिडे व सौ. लताताई ओंकार ह्यांची विशेष उपस्थिती होती. दुसऱ्या कुलवृत्ताच्या प्रकाशनानंतर प्रतिष्ठानची आर्थिक घडी विस्कटली होती. त्यानंतर प्रतिष्ठानचे पदाधिकारी, कार्यकर्ते ह्यांनी मोलाचे योगदान देऊन आजमितीला प्रतिष्ठान भक्कम आर्थिक पायावर उभे आहे. तरुणांनी सहभागी होऊन आपल्या समाजाचा, कुलाचा आर्थिक व सामाजिक विकास व्हावा ह्या उद्देशाने आपला खारीचा वाटा ह्या उपक्रमात द्यावा असे आवाहन प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. शशिकुमारजी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात केले. 'सूत्रसंचालन करणाऱ्या सौ. वीणाताई ह्या प्रतिष्ठानच्या कार्यक्रमासाठी एकाच हाकेला साद देतात' अशा शब्दांत सौ. संपदा भिडे यांनी कौतुक करून सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमानंतर सर्वांनी स्नेहभोजन केले आणि हा छोटेखानी कार्यक्रम खऱ्या अर्थाने आनंदाने साजरा झाला.

# हार्दिक अभिनंदन

**ॲड. सौ. प्रज्ञा प्रशांत भिडे,** दादर, मुंबई यांना दर्पणकार



बाळशास्त्री जांभेकर राष्ट्रीय समाज गौरव पुरस्कार नुकताच मिळाला. जागतिक पितृदिनाचे औचित्य साधून हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला. सदर पुरस्कार जांभेकर पत्रकार संघ व अस्तित्व सोशल फौंडेशन यांच्यातर्फे देण्यात आला. सौ. प्रज्ञा भिडे ह्या सामाजिक बांधिलकीतून नेहमीच सक्रिय असतात. विशेषतः कोविड महामारीच्या काळातील त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे. भिडे प्रतिष्ठान तर्फे त्यांना भविष्यातील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा आणि अभिनंदन !

***

**श्री. ऋषिकेश जयराम भिडे,** सोलापूर यांना नुकतेच **'Attack**



**Path and graphic creation based on user and system profiling'** या शीर्षकाचे पेटंट मिळाले आहे. हे पेटंट वापरकर्ता व संगणक जोखीम आधारित कंपनी यांच्यावर होणारा संभाव्य हल्ला कोणत्या मार्गाने होईल हे ओळखण्याची एक पद्धत आहे. सदर पेटंट कंपनीला त्यांच्या सुरक्षिततेमधील कमकुवत दुवे त्वरित ओळखण्यास सक्षम करते. त्या अनुषंगाने सावधानता मिळते. श्री. ऋषिकेश वालचंद कॉलेज सांगली येथून बी.टेक. (आय.टी.) झाले. ११ वर्षांचा सायबर सिक्युरिटीमध्ये काम करण्याचा अनुभव आहे. ॲण्टी व्हायरस डेव्हलपर काम केले आहे. **Ethical Hacker** म्हणून गुगल, जनरल मोटर्स व **AVG Symantec, Qualys, DWC** कंपन्यांमध्ये काम केले आहे. सध्या यूकेमध्ये मॅनेजर फॉर थ्रेट रिसर्च म्हणून काम करीत आहे. श्री. ऋषिकेश भिडे यांना नित्युंदय गोत्रीय भिडे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन आणि शुभेच्छा !

***

कोल्हापूर येथे नुकत्याच झालेल्या जलतरण स्पर्धेमध्ये **कु. निधी**



**शरद भिडे,** रत्नागिरी हिने १०० व ५० मीटर ब्रेस्टस्ट्रोकमध्ये प्रत्येकी एक सुवर्ण पदक व ५० मीटर फ्रीस्टाईलमध्ये कास्यपदक मिळविले. नित्युंदय गोत्रीय भिडे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन आणि उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा !

***

सौ. मंजिरी व श्री. गोविंद यशवंत भिडे यांचे चिरंजीव **डॉ. केदार गोविंद भिडे,** मु. माभळे, संगमेश्वर (भिडेवाडी) यांना



आय.आय.टी. मुंबई येथून यांत्रिकी अभियांत्रिकी विषयांत डॉक्टरेट प्राप्त झाली. डॉ. केदार यांचे नित्युंदय गोत्रीय भिडे प्रतिष्ठानतर्फे अभिनंदन आणि उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा !

***



सौ. स्नेहल व श्री. प्रकाश श्रीराम भिडे, मार्कंडी, चिपळूण, रत्नागिरी यांची कन्या **कु. कीर्ति भिडे** हि चार्टर्ड अकौंटंट परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात चांगल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाली. नित्युंदय गोत्रीय भिडे प्रतिष्ठानतर्फे तिचे अभिनंदन आणि उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा !

## एप्रिल ते जून २०२२ देणगीदार

| | रुपये | |
|---|---|---|
| १) श्री. रवींद्र भिडे, विलेपार्ले, मुंबई | १५,००० | देणगी |
| २) श्रीमती सुमती वामन भिडे, पुणे | १०,००० | आश्रयदाता |
| ३) श्री. अरविंद श्रीपाद भिडे, पुणे | ५,००० | देणगी |
| ४) सुनिती शरद ओक (भिडे), पुणे | १,००० | देणगी |
| ५) लता ओंकार (भिडे), पुणे | १,००० | देणगी |
| ६) पुष्पा विष्णू भिडे, देवगड, सिंधुदुर्ग | २,००,००० | शैक्षणिक देणगी |
| ७) श्री. रवींद्र प्रभाकर भिडे, पुणे (वडिलांचे जन्मशताब्दी निमित्त) | १०,००० | देणगी |
| ८) श्री. श्रीपाद श्रीकांत भिडे, तळेगाव दाभाडे | १,००० | देणगी |
| ९) श्री. मनोहर शंकर भिडे, पुणे | १,००० | देणगी |
| १०) श्री. श्रीधर विनायक भिडे, बोरिवली | २,००० | देणगी |
| ११) श्री. सुहास श्रीधर भिडे, बोरिवली | २,००० | देणगी |
| १२) सौ. शर्मिला सुहास भिडे, बोरिवली | १,००० | देणगी |
| १३) श्री. प्रदीप जनार्दन भिडे, डोंबिवली | १,००१ | देणगी |
| १४) श्री. अनिल सुरेश भिडे, पुणे | ५,००१ | देणगी |
| १५) श्री. संजय भिडे, पुणे | १,००० | देणगी |
| १६) श्री. मिलींद वसंत भिडे, पनवेल | १,००० | आजीव सभासद |
| १७) सौ. गार्गी मिलिंद भिडे, पनवेल | १,००० | आजीव सभासद |
| १८) सौ. वीणा सुनिल केळकर (भिडे), पुणे | १,९८० | देणगी |
| १९) श्री. अरुण शंकर भिडे, बोरिवली | १,००० | देणगी |
| २०) श्रीमती उज्ज्वला बाळकृष्ण साठे, पुणे | १००० | देणगी |
| २१) श्री. अनंत नरहर भिडे, पाली, रायगड | १००० | देणगी |

**भिडे प्रतिष्ठानचे संस्थापक व माजी अध्यक्ष, दूरदर्शनचे ज्येष्ठ निवेदक श्री. प्रदीप ज. भिडे यांचे ता. ७ जून २०२२ रोजी दुःखद निधन झाले. ईश्वर त्यांना चिरशांती देवो ही प्रार्थना. नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानतर्फे स्व. प्रदीपजींना आदरांजली !**

# मी अनुभवलेले प्रदीप भिडे

- दिलीप वा. भिडे
विश्वस्त, भिडे प्रतिष्ठान

भिडे प्रतिष्ठानचे संस्थापक व माजी अध्यक्ष तसेच दूरदर्शचा चेहरा म्हणून ओळख असलेले दूरदर्शन ज्येष्ठ निवेदक श्री. प्रदीप भिडे यांचे नुकतेच निधन झाले. ५० वर्षे पत्रकार, सूत्रसंचालन अशा विविध क्षेत्रांत उत्तम कामगिरी करून बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये सुद्धा आपल्या कार्याचा ठसा उमटवला. भारदस्त आवाज, स्पष्ट उच्चार करीत सायंकाळी ७ च्या बातम्यांध्ये 'नमस्कार आजच्या ठळक बातम्या' ऐकायला प्रेक्षक उत्सुक असत.



नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानची मुहूर्तमेढ आणि संस्थेच्या जडणघडणीत त्यांचा सिंहाचा वाटा होता. तो इतका की कदाचित ही व्यक्ती मिळालीच नसती तर २२ वर्षांचा झालेला भिडे वृक्ष बघायला सुद्धा मिळाला नसता असे म्हणणे वावगे ठरणार नाही. आपण भिडे आहोत आणि प्रत्येक भिडे व्यक्ती व कुटुंबासाठी काहीतरी करायला पाहिजे ही त्यांची आत्मीयता नेहमीच दिसून येत होती.

सामाजिक बांधिलकीतून आपला उपयोग समाजाला व्हावा आणि काम करायची आवड व हौस म्हणून मी पण भिडे प्रतिष्ठानच्या कार्यात १९९९ च्या भिडे बाग, पुणे येथील पहिल्या सभेनंतर जोडला गेलो. २००२ मध्ये पुण्यात भिडे सेंलन आणि वार्षिक सभा झाली. त्यायोगे पुण्यातील व्यवस्था काही प्रमाणात माझ्याकडे होती. त्या अनुषंगाने त्यांचा व माझा जास्त परिचय झाला आणि पुण्यातून काम करणाऱ्या माझ्यासारख्या कार्यकर्त्याला त्यांनी हेरले. खरंतर मी त्यावेळेस नोकरीत होतो परंतु कामाची आवड असल्यामुळे मी प्रत्येक सभा व संमेलनाला हजेरी लावत असे.

२००५ मध्ये तळेगांव दाभाडे, पुणे येथे भिडे संमेलन झाले. मला सभाधीटपणा नव्हता किंवा स्टेजवर जाऊन बोलण्याचा प्रसंग आला नव्हता. परंतु एका पुरस्काराचे निवेदन दिलीपने करावे असे त्यांनी कै. दामुकाकांना सुचविले. मी तयार नव्हतो तरीपण आग्रहाखातर मी आयुष्यातील त्या दिवशी प्रथमच पुरस्काराचे निवेदन केले आणि पुढे पुढे सवय झाली.

२००७ मध्ये पुण्यात झालेल्या जागतिक पहिल्या चित्पावन संमेलनाचे सूत्रसंचालन करण्याची जबाबदारी प्रदीपजींकडे होती. त्या निमित्ताने काही निरोप, कामे असत. त्यावेळेस विनय आपटे, विक्रम गोखले ह्यांच्याशी एक-दोनदा संपर्क साधता आला. पहिल्या कुलवृत्ताचे प्रकाशन १९५३ साली पुण्यात केसरीवाडा येथे झाले. त्याचे औचित्य साधून दुसऱ्या भिडे कुलवृत्ताचे प्रकाशन २००८ मध्ये पुण्यात आणि केसरीवाडा येथेच घ्यायचे हा त्यांचा हट्ट होता. प्रकाशन भव्य आणि दिव्य झाले पाहिजे आणि प्रकाशनासाठी मोठी साहित्यिक व्यक्ती म्हणून श्री. राम शेवाळकरांनाच आणायचे ही खुणगाठ त्यांनी बांधली होती, त्यामुळे पुण्यातील केसरीवाड्यात हॉल बघणे, चौकशी करणे, पुण्यात श्री. शेवाळकर सरांची ने-आण, राहण्याची व्यवस्था ही त्यांनी माझ्याकडेच सोपवली. दामूकाका, प्रभाकरपंत, विनायकराव इत्यादींपैकी कोणी हॉल बघून या व पैसे भरून नक्की करावा अशा सूचना त्यांनी कार्यकारिणी बैठकीमध्ये दिल्या. कार्यक्रम अपेक्षेपेक्षा सुंदर झाला, त्यानंतर त्यांनी दिलेली शाबासकीची थाप अजूनही स्मरणात आहे.

२००७ मध्ये कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये दोन कार्याध्यक्ष, एक मुंबई व एक पुणे ह्यांना कार्यकारिणीत समाविष्ट करून घ्यावे, त्यादृष्टीने मिटिंगमध्ये ठरले. म्हणून पुण्यातून मी एक नाव सुचविले. त्यानुसार पुण्यात होणाऱ्या वार्षिक सभेमध्ये ह्या दोन कार्याध्यक्षांची नेमणुकीच्या कार्यवाहीची मान्यता घेण्याचे ठरले. परंतु पुण्यातून जे नाव होते त्या नावाला पुण्यातून काहींचा विरोध सभेध्ये होण्याची शक्यता आहे असे मला समजले. त्याप्रमाणे दामूकाका, प्रभाकरपंत यांना संपर्क करून ही बाब त्यांच्या कानावर घातली. साहजिकच प्रदीपजींपर्यंत ही बातमी गेल्यावर त्यांनी मला लोकांचा विरोध कशासाठी आहे हे समजून घेतल्यानंतर ती व्यक्ती समाविष्ट झाल्यावर प्रतिष्ठानला काहीही नुकसान होणार नाही ही खात्री मी त्यांना देताना उलट भविष्यात संस्थेचा फायदाच होईल असे सांगितले. तरीपण मी प्रदीपजींना म्हणालो की काही बोटावर मोजणाऱ्या लोकांचा विरोध झाला तर गोंधळ होण्याची शक्यता आहे. हे ऐकून त्यांनी तात्काळ सांगितले की मी पुण्यातील मिटिंगला येतो आणि सर्व काही सुरळीत होईल, काळजी करू नका. त्याप्रमाणे ते सपत्नीक त्या मिटिंगला आले आणि प्रतिष्ठानमध्ये दोन कार्याध्यक्षांची

निवड बिनविरोध झाली. म्हणजेच त्यांच्या असण्याला खूप किंमत होती. असे व्यक्तिमत्त्व पुन्हा होणे नाही हे विशेष नमूद करावेसे वाटते. २०१४ च्या डोंबिवली संमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून बोलवायचे असे ठरले. त्यासाठी मी त्यांना फोन करून याल का असे विचारल्यावर तात्काळ त्यांनी होकार दिला. २००६ मध्ये ठाणे येथे एका वार्षिक सभेत एक दिवंगत विश्वस्त आणि एक भिडे महिला ह्या दोघांचे तात्त्विक मतभेद एवढे टोकाला गेले की तो वाद काही केल्या संपेना. सरतेशेवटी 'नदीचे मूळ आणि ऋषीचे कूळ' हे शोधणे कठीण आहे असे सांगून प्रदीपजींनी तो विषय सहजगत्या थांबविला. २००८ च्या भिडे कुलवृत्त प्रकाशनानंतर झालेल्या कार्यकारिणी मिटिंगमध्ये झालेला तोटा भरून काढण्यासाठी प्रयत्न करायचा हे सुचविले. म्हणजे कुठेही वाद वाढवू न देता तसेच निर्णय घेताना तो सर्वसमावेशक कसा असेल ह्याचा अंदाज घेऊन त्यावर तात्काळ तोडगा काढून तो वाद संपविण्याची त्यांची हातोटी होती. २०१५-१६ च्या सुमारास प्रतिष्ठानची नवीन कार्यकारिणी निवड होताना काही कायदेशीर अडचणी निर्माण झाल्या. त्याप्रमाणे गोष्टींची माहिती घेऊन सांगितले की अनेक वर्षे, अनेक व्यक्तींनी ही संस्था मोठी करण्यासाठी निःस्वार्थीपणे प्रयत्न, धडपड करीत आहेत. त्यानुसार रितसर कायदेशीर सल्ला घेणे उचित होईल असा सबुरीचा सल्ला त्यांनी दिला.

२०१७ च्या गोवा संमेलनाअगोदर त्यांनी मला फोनवर जेव्हा त्यांच्या गंभीर आजाराची कल्पना दिली त्यावेळेस क्षणभर मी अवाक झालो, पण त्यांनी तो आजार सहजतेने स्वीकारला होता. इंजेक्शने झाली, अन् ट्रीटमेंट पूर्ण झाली की मी लवकर बरा होईन आणि गोवा संमेलनाला सुद्धा यायला मला आवडेल. पण दुर्दैवाने तो योग शेवटपर्यंत नियतीने येऊ दिला नाही ह्याची सल मात्र कायम आहे. प्रदीपजींचा व माझा संबंध फक्त प्रतिष्ठानपुरताच मर्यादित नव्हता तर माझी वैयक्तिक कामे सुद्धा त्यांनी केली. माझ्या भाचीला राष्ट्रपती बालपुरस्कार मिळाला होता. तिची मुलाखत दूरदर्शनवर घेण्यासाठी त्यांनी तात्कालीन वृत्त निवेदिकेला सांगताना माझा धाकटा भाऊ आहे असा उल्लेख केला होता. भिडेसाहेब हे आमचे ज्येष्ठ मार्गदर्शक आहेत, त्यामुळे त्यांचा शब्द आम्हाला येणे हा आमचा सन्मान समजतो. एवढी आपुलकी त्यांचेबद्दल तेथील कर्मचारी किंवा वरिष्ठ लोकांना होती. त्यामुळे मला पण दूरदर्शनमध्ये जाऊन तेथील काम कसे चालते हे पाहायला मिळाले. २००८ च्या कुलवृत्त प्रकाशनानंतर ते प्रतिष्ठानच्या नियमित संपर्कात नसत. परंतु दर एक-दोन महिन्यांनी फोनवरून प्रतिष्ठानविषयी चौकशी ते करीत असत. मी त्यावेळेस नोकरी करत होतो. त्यामुळे फोन केल्यावर तू मोकळा आहेस ना ? असे सर्वप्रथम विचारत असत. एक दिवस चिंचवड येथे सकाळी ११ वाजता त्यांना पुरस्कार मिळणार होता. मी आकुर्डीमध्ये नोकरीस असल्यामुळे मी तेवढा वेळ काढून त्या समारंभाला हजर होतो. समारंभ संपल्यानंतर त्यांच्या बाजूला इतर माणसे असताना सुद्धा मला पाहिल्यावर ते स्वतः या गराड्यातून मला भेटायला आले. म्हणजे आपल्या माणसांशी संपर्क ठेवून त्यांची आपुलकी व आत्मीयता दिसून आली.

५० वर्षे विविध क्षेत्रांत काम करून सुद्धा या साऱ्या प्रवासात त्यांचे जमिनीवरचे पाय सुटले नाहीत. स्वभावातील मोकळेपणा दुणावला नाही. समृद्ध वाणी, दूरदर्शनवर, वृत्त निवेदन, सूत्रसंचालन करणारे व्यक्तिमत्त्व आपल्यातून निघून गेल्याचे दुःख वाटते. परंतु आजमितीला संध्याकाळी ७ च्या बातम्या ऐकताना मात्र 'नमस्कार, आजच्या ठळक बातम्या' हे ऐकल्यावर त्यांची आठवण आल्याशिवाय राहात नाही.

---

# परीस व्यक्तिमत्त्व

**- सौ. संपदा राजेंद्र भिडे,**
विश्वस्त, भिडे प्रतिष्ठान

सर्वश्रुत नामवंत व्यक्तिमत्त्व कै. प्रदीप भिडे हे नाव मी लहान असताना ऐकले होते. प्रत्यक्षात कधी त्यांच्याशी संवाद साधायला मिळेल असे स्वप्नात सुद्धा वाटले नव्हते. पण काय योगायोग पहा, मला प्रतिष्ठानसाठी काम करायची संधी मिळाली आणि काही जुन्या कागदपत्रांवर स्वाक्षरी घेण्यासाठी त्यांच्या घरीच जायचा योग आला. त्यांच्याकडे गेल्यावर ते कधीही चहा-नाश्ता घेतल्याशिवाय सोडत नसत. प्रतिष्ठानसाठी काम करणाऱ्यांवर त्यांची विशेष मर्जी असे. ते नेहमी सांगत, प्रतिष्ठानच्या कामासाठी मला कधीही फोन करा, मी बोलेन. एकदातर मला उशिरा घरी यायला नको म्हणून त्यांनी मला दूरदर्शनला बोलावलं आणि लगेच माझं काम केलं. तेवढ्यात मी दूरदर्शन आतून पाहून घेतलं. आता त्यांनीच बघ म्हटल्यावर मला कोण अडवणार ? त्यांचे शब्द नेहमी प्रेरणादायी असत. ती सकारात्मक ऊर्जा थोडीशी माझ्याही वाट्याला आली. २०१३ साली प्रतिष्ठानचं मुंबई विभागीय संमेलन होणार असं कळलं. त्यासाठी श्री. संजय भिडे, बांद्रा यांनी सभा बोलवली. आता तिकडे बरीच दिग्गज मंडळी असतील याची कल्पना होती, तरी खारीचा वाटा द्यायला आम्ही काही नवीन मंडळी पण गेलो. पाहिलं तर स्वतः प्रदीप भिडेसर सभेला. मी थोडी बावरलेच. नवीन सदस्यांनी सूत्रसंचालन करावं असं त्यांनी सुचवलं. त्यासाठी माझी आणि सौ. पूर्वा देवधर यांची त्यांनी निवड केली. कधीही व्यासपीठावर उभं न राहिलेली मी होकार देण्यासाठी थोडी घाबरत होते. पण मूर्तिमंत सूत्रसंचालनच मला म्हणाले, 'काही घाबरू नको. विश्वासाने पुढे हो. आपल्या भिडे कुटुंबासमोरच बोलायचंय. काही चुकलं तरी घरचीच सगळी मंडळी आणि काय सांगू, संमेलन खूप छान झालं. काही महत्त्वाच्या कामामुळे ते येऊ शकले नाहीत, पण त्यांच्याकडून शाबासकी आणि शुभेच्छा जरूर मिळाल्या. माझी व्यासपीठाची भीती गेली ती त्यादिवशी. माउलींनी सांगितल्याप्रमाणे, लोहाचे कनक होये। हे सामर्थ्य परिसिंच आहे॥ अशा परीस व्यक्तिमत्त्वाला शत शत नमन !

# आठवणी प्रदीपरावांच्या...

- प्रभाकर शंकर भिडे
विश्वस्त, भिडे प्रतिष्ठान

काही माणसे जन्माला येतानाच प्रसन्न व्यक्तिमत्त्व, खणखणीत आवाज आणि बघितल्यावर त्यांच्याविषयी आदर उत्पन्न व्हावा अशी रूपसंपदा घेऊन येतात. ही जणू त्यांच्यावर ईश्वराची कृपादृष्टी असावी. असे आपल्या पाहण्यात आलेले व्यक्तिमत्त्व म्हणजे दूरदर्शनवरील वृत्त निवेदक श्री. प्रदीप भिडे. दुर्दैवाने नुकतेच त्यांचे निधन झाले. भिडे प्रतिष्ठानचे ते पहिले अध्यक्ष होते.

काही व्यक्ती आपल्या जीवनात योगायोगाने येतात. कवीवर्य माडगूळकरांच्या गाण्याप्रमाणे ‘दोन ओंडक्यांची होते सागरात गाठ, का त्याला काही कारण नसते’ आपण त्यांच्या सहवासात आल्यावर त्यांचे गुण, स्वभाव आपल्याला कळतो. आपल्याकडूनही थोडेफार समाजकार्य त्यांच्या मार्गदर्शनामुळे होते. आज ते गेल्यावर मागील २०-२२ वर्षांमधील अनेक आठवणी जागृत झाल्या.

मी २००० साली नोकरीतून निवृत्त झालो. आता उर्वरित आयुष्य आपल्या आवडीच्या गोष्टी करायच्या असे योजले होते. आपल्या आवडीचा छंद जोपासून मनाला समाधान मिळेल, असे मनात येतहोते. मला थोडीफार वाचन, लिखाणाची आवड. सामजिकच पै फ्रेंड लायब्ररी व ग्रंथाली दोन्हीमध्ये सहभाग घेतला. अचानक एक दिवस डोंबिवलीमधील दामोदर भिडे आले. त्यांनी बोलताना सुचविले की तुम्ही मदत केल्यास डोंबिवलीतील भिडे प्रतिष्ठानचे काम (भिडे कुलवृत्त बनविण्यासाठी) करता येईल. त्यानंतर दर शनिवार-रविवारी जाऊन डोंबिवलीतील ६०-७० लोकांची माहिती घेऊ असे त्यांनी सुचविले. कुलवृत्ताला हातभार लावू. मी आणि ते काम करू लागलो. येथील काम झाल्यावर एक दिवस दादर कार्यालयात गेलो. तेथे प्रदीपराव भिडे यांची भेट झाली. त्यांचे गोड, मृदू बोलणे, भिडे कुलवृत्ताच्या निमित्ताने सर्व लोकांना एकत्र करून काही गरजू लोकांना मदत करता येईल. त्यासाठी कुलवृत्त तयार करू. आपली माणसे जाणून घेऊ. त्यावेळी ते सिद्धीविनायक मंदिराचे सरकारी विश्वस्त होते. तेथे दोन-तीन भिडे लोकांच्या सभा घेतल्या. दादरच्या भिडे प्रेसमध्ये भिडे कुलवृत्ताचे काम सुरू झाले त्यावेळी त्यांच्याबरोबर सॅटरडे क्लबचे माधवराव भिडे होते. वसईचे मुकुंदराव व पनवेलचे विश्वास भिडे होते. दादरला प्रभादेवी येथे श्री. सतीश व त्यांचे बंधू अभय या भिडे मंडळींचे कार्यालय होते. तेथे आम्ही कामासाठी जाऊ लागलो. साहजिकच मधून मधून प्रदीपराव येत.

बघता बघता प्रदीपरावांनी भिडे कुलवृत्त संपादनाची जबाबदारी आमच्या ग्रुपवर सोपवली. माझ्यावर मुख्य संपादकाची जबाबदारी होती. त्या निमित्ताने सतत त्यांची भेट होई. त्यांचे विचार मोकळे. बोलणे, वागणे कळू लागले. लक्षात आले की माणसे जोडण्याची त्यांची कला विलक्षण आहे. एकदा मी त्यांना सांगितले की माझ्या मुलाचे लग्न पुढच्या महिन्यात आहे. तुम्ही यावे अशी मनापासून इच्छा आहे. लागलीच त्यांनी छोटे कॅलेंडर काढून त्यावर डेट मार्क केली. मी येणार असे अगत्याने सांगितले आणि ते आवर्जून आले. मला आनंद वाटला. मला सांगायचे की लिखाण, संपादक यांच्याशिवाय इतर कोणतीही अडचण किंवा कोणाशी संपर्क हवा असल्यास मला सांगा. अनेक वेळा ते कितीतरी प्रसिद्ध मोठ्या व्यक्तींना फोन करीत. आम्हाला हवी असलेली माहिती उपलब्ध करीत. प्रत्येक मिटिंगमध्ये काही काही नवीन सुचवित.

दर वर्षी आम्ही एकेक गावाला भिडे संमेलन घेत असू. त्यावेळी त्या लोकांशी बोलून (मग ते रत्नागिरी असो किंवा पुणे, सांगली असो.) सर्व व्यवस्था करीत. त्यांचे सर्व कलाकार (मग ते गायक, वादक, अभिनेते असो) लोकांशी जिव्हाळ्याचे नाते होते. तसेच ते अनेक सरकारी कार्यक्रमांचे विशेषतः राज्यपाल, मुख्यमंत्री, केंद्रीय राज्य सचिव यांच्या विविध उपक्रमांचे सूत्रसंचालन करीत. त्याकरिता सरकारचे विशिष्ट नियम व शिस्त असते. काही वेळा आम्हाला आवर्जून बोलवत. इतर पुण्या-मुंबईतील अनेक संस्थांचे कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करीत. त्यावेळी त्यांचे बोलणे, ते कार्यक्रम रंगतदार व यशस्वी करण्याकरिता आवश्यक माहिती तसेच मध्येच एखादा विनोदी किस्सा सांगून कार्यक्रमाची लज्जत व उंची वाढवत. तसेच काही नाटकांमध्ये ते भाग घेत असत. पण बऱ्याच कंपन्यांमध्ये त्यांनी पब्लिक रिलेशन ऑफिसर म्हणून काम केले. त्यामध्ये हिंदुस्थान लिव्हर पासून अनेक कंपन्या होत्या. याशिवाय त्यांचा वैशिष्ट्यपूर्ण खणखणीत व स्वच्छ आवाज यामुळे त्यांच्या दूरदर्शनच्या बातम्यांचे निवेदन उठून दिसे. समाजामध्ये काही कठीण प्रसंग, दंगल वगैरे झाली तर आवर्जून तेच निवेदन करत होते. त्यांना नटांप्रमाणे ग्लॅमर होता. अनेक लोक त्यांच्याशी बोलण्यास उत्सुक असत. ते सर्वांशी अत्यंत खेळीमेळीने, नम्रतेने व मोकळेपणाने बोलत. भिडे प्रतिष्ठानच्या व आमच्या वैयक्तिक कामामध्ये ते मदत करीत. माझी नात त्यांनी एकदा बघितली व तिच्या नेटकेपणावर, दिसण्यावर ते खुश झाले. ते मला सांगत की पोर्टफोलिओ बनवा. मला द्या. पुढचे मी बघेन. अशा अनेक प्रसंगात त्यांचा आम्हाला उपयोग होई. त्यांच्यामुळे मी एक-दोनदा दूरदर्शन कार्यक्रमात सहभागी झालो होतो. अनेकवेळा कामानिमित्त त्यांच्या अंधेरी येथील घरी जाण्याचा प्रसंग येई. त्यावेळी ते स्वतः व त्यांचे कुटुंबीय मनापासून आदरातिथ्य करीत. त्यांनी एक-दोनदा पुण्याच्या ‘गणेश फेस्टिवल’ जो पुणे काँग्रेस अध्यक्ष सुरेश कलमाडी फार मोठ्या प्रमाणावर साजरा करीत. त्याचे निमंत्रण दिले होते. ते जवळजवळ एक आठवडा त्यांचे संयोजन, सूत्रसंचालन करीत. आम्ही ७-८ वर्षे प्रयत्न करून ‘कुलवृत्त’ पूर्ण केला त्यामध्ये जवळजवळ १४०० कुटुंबांची माहिती तसेच त्यांची

एकमेकांशी अनेक शाखा, घराणी वगैरे बघून ते खुश झाले. त्यासाठी त्यांनी चित्रपटाप्रमाणे एक टॅग लाईन लिहून दिली. 'अखंड कुलप्रवाहाचा वेध'. त्यांनी अत्यंत हौसेने पुण्याच्या केसरीवाड्याच्या कार्यालयात ५०० च्या वर भिडे लोकांच्या उपस्थितीत प्रकाशन समारंभ केला. त्याकरिता त्या वेळचे प्रसिद्ध साहित्यिक व उत्तम वक्ते राम शेवाळकर यांना बोलावले. केवळ प्रदीपजींच्या दोस्ती, परिचयामुळे ते आले व त्यांनी उत्तम भाषण करून समारंभाची उंची वाढवली.

श्री. प्रदीपजींच्या आग्रहामुळे सर्व संपादक मंडळाचा सत्कार करून मानपत्र प्रदान केले गेले. आम्हा सर्वांचा श्री. राम शेवाळकरांच्या हस्ते सत्कार झाल्यामुळे आम्ही भारावून गेलो. केलेल्या कामाचे चीज झाले असे आम्हाला वाटले. कुलवृत्त प्रसिद्धीनंतर श्री. प्रदीपजींनी स्वतः त्यावेळचे मुंबईचे आयुक्त डॉ. सतीश भिडे यांना कुलवृत्त भेट दिला. त्यांनीही आमचे खूप कौतुक केले. श्री. प्रदीपजी पूर्वी स्नेहसंमेलनात उपस्थित राहून अमूल्य मार्गदर्शन करायचे. त्यातून आम्हाला अनेक गरजू भिडे लोकांना मदत करण्याची प्रेरणा मिळाली. प्रकाशनानंतर त्यांनी अध्यक्षपद स्वतःकडे न ठेवता माधवराव भिडे व इतर भिडे लोकांकडे दिले.

तीन-चार वर्षांपूर्वी त्यांची तब्येत अचानक बिघडली. पुढे कर्करोगाचे निदान झाले. आवश्यक ती उपाय योजना करून ते कार्यरत राहण्याचा प्रयत्न करीत. एक आदर्श व समाजोपयोगी व्यक्तिमत्त्व म्हणून ते कायम स्मरणात राहिले. त्यावेळी त्यांना मुख्यमंत्र्यांचे पत्र आले होते व त्यांना सर्व प्रकारची वैद्यकीय मदतीची तयारी दाखवली होती. आम्ही त्यांना मधून मधून दूरध्वनी करून चौकशी करीत असू. पण ते नेहमी सकारात्मक व आशावादी बोलत. ३-४ वर्षांपूर्वी डोंबिवलीतील भिडे संमेलनात भेट त्यांची झाली होती. पण असे म्हणतात की देवाला सुद्धा चांगली माणसे आवडतात. त्यामुळे हल्लीच्या दिवसात फार वय झाले नसतानासुद्धा त्यांच्या निधनाची बातमी ऐकावी लागली. म्हणतात ना जो आवडे सर्वांना तोचि आवडे देवाला ! पण आमच्या स्मृतिमध्ये त्यांचे नाव कायमचे कोरले आहे ते कोणी पुसू शकत नाही. त्यांनी सह्याद्री वाहिनीवरील अनेक प्रसिद्ध व्यक्तींच्या मुलाखती व परिसंवादाचे आयोजन केले. त्या कायमच्या आपल्या स्मरणात राहतील. त्यांना या लेखाद्वारे भिडे प्रतिष्ठानतर्फे श्रद्धांजली.

---

# १५ ऑगस्ट : हेही पाच देश साजरा करतात स्वातंत्र्यदिन !

**१५ ऑगस्ट हा प्रत्येक भारतीयासाठी अभिमानाचा दिवस आहे, कारण या दिवशी भारतातील लोकांना ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून स्वातंत्र्य मिळाले. अनेक वर्षे भारत गुलामगिरीच्या साखळदंडात अडकून राहिला, परंतु आपल्या देशातील अनेक शूर पुत्रांनी आपला जीव धोक्यात घालून देशाला स्वतंत्र केले. एक प्रदीर्घ संघर्षानंतर देश स्वतंत्र झाला आणि हे स्वातंत्र्य दरवर्षी १५ ऑगस्ट रोजी मोठ्या थाटामाटात साजरे केले जाते. यावर्षी आपण ७६ वा स्वातंत्र्यदिन साजरा करणार आहोत. पण केवळ भारतच नाही तर इतर पाच देशही १५ ऑगस्ट रोजी स्वतंत्र झाले आहेत. त्यांचा स्वातंत्र्यदिवसही आजच साजरा केला जातो.**

* **बहरीन** – बहरीन ब्रिटिशांच्या गुलामगिरीत कैद झाला आणि १५ ऑगस्ट १९७१ रोजी या देशाला स्वातंत्र्य मिळाले. तथापि, ब्रिटीश सैन्याने १९६० च्या दशकात बहरीन सोडण्यास सुरुवात केली. पण १५ ऑगस्ट रोजी बहरीन आणि ब्रिटन यांच्यात एक करार झाला आणि त्यानंतरच बहरीन एक स्वतंत्र देश बनला. कारण त्याचे शासक इसा बिन सलमान अल खलिफा बहरीनच्या सिंहासनावर विराजमान झाले.
* **कांगो** – १५ ऑगस्ट १९६० रोजी कांगोने फ्रान्सपासून स्वातंत्र्य मिळविले. १८८० पासून फ्रान्सने हा देश ताब्यात घेतला होता. कांगो हा आफ्रिकन देश आहे. स्वातंत्र्यानंतर ते कांगो प्रजासत्ताक बनले.
* **लिकटेंस्टाईन** – या देशाला १५ ऑगस्ट १८६६ रोजी स्वातंत्र्य मिळाले. लिकटेंस्टाईन जर्मनीपासून स्वतंत्र झाला. १९४० पासून, हा देश १५ ऑगस्ट रोजी दरवर्षी स्वातंत्र्यदिन साजरा करीत आहे.
* **दक्षिण कोरिया** – दक्षिण कोरिया देश १५ ऑगस्ट १९४५ रोजी स्वतंत्र झाला. दक्षिण कोरियाला जपानपासून स्वातंत्र्य मिळाले. त्यावेळी अमेरिका आणि सोव्हिएत सैन्याने दक्षिण कोरियाला जपानी ताब्यातून बाहेर काढले. कोरियाचे लोक हा दिवस राष्ट्रीय सुट्टी म्हणून साजरा करतात.
* **उत्तर कोरिया** – हा देश १५ ऑगस्ट १९४५ रोजी स्वतंत्र झाला आणि दक्षिण कोरियाप्रमाणे उत्तर कोरियालाही जपानपासून स्वातंत्र्य मिळाले. हा देश हा दिवस राष्ट्रीय सुट्टी म्हणून देखील साजरा करतो. विशेष म्हणजे सुट्टी असल्यामुळे तेथील लोक या दिवशी लग्न करतात, जी आता एक परंपरा बनली आहे. उत्तर कोरियामध्ये लोकशाही संकेतांना अनुसरून राजकीय व्यवहार होत नसल्याची टीका पश्चिमेकडील देशांकडून अजूनही केली जात आहे.

# भिडे कुलवृत्त तिसरी डिजीटल आवृत्ती

भिडे कुलवृत्ताची तिसरी आवृत्ती आता डिजीटल मध्ये होणार असल्यामुळे दुसरी आवृत्तीमधे असलेल्या माहितीनंतरची पुढील वंशावळीसाठी माहिति द्यावयाची असेल, त्यांनी खाली दिलेल्या सूचनेनुसार संगणकीय कुलवृत्ताची **xls** फाईल पाहताना काही शंका, अडचण असेल तर श्री. शंतनु भिडे, मो. ९८६०५७५३५२ ह्या नंबरवर किंवा **shantubhide@gmail.com** ह्या मेल आयडीवर रात्री ९ ते १० ह्या वेळेत संपर्क साधावा.

*नमस्कार,*

कळविण्यास आनंद होतो आहे की, आपण संगणकीय भिडे कुलवृत्त तयार करण्याच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले आहे आणि आपल्या २००८ च्या कुलवृत्तामधील पुरुष आणि स्त्रिया मिळून १३,३००+ नावांचा डेटा तयार केला आहे. आपण प्रत्येक सभासदाला एक अनुक्रमांक दिला आहे जो ६ आकड्यांचा असेल. ज्याची यादी **(xls format)** आपल्या साईट **"http"//www.bhidekul.in/"** वर लवकरच प्रकाशित केली जाईल

| Sr. No. | Page No. | Mamber ID | **Pidhi 1** | Mamber ID | **Pidhi 2** | Mamber ID | **Pidhi 3** | Mamber ID | **Pidhi 4** | Mamber ID | **Pidhi 5** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 493 | 104094 | **Mahadev** | | | | | | | | |
| 2 | 493 | | | 104095 | **Balwant** | | | | | | |
| 3 | 493 | | | | | 104097 | **Narhari** | | | | |
| 4 | 493 | | | | | | | 104099 | **Shyam** | | |
| 5 | 493 | | | | | | | | | 104103 | **Anil** |
| 6 | 493 | | | | | 104098 | **Shankar** | | | | |
| 7 | 493 | | | | | | | 104100 | **Balwant** | | |
| 8 | 493 | | | | | | | | | 104103 | **Surendra** |
| 9 | 493 | | | | | | | 104101 | **Madhukar** | | |
| 10 | 493 | | | | | | | 104102 | **Avadhoot** | | |
| 11 | 493 | | | 104096 | **Shripad** | | | | | | |

| Sr. No. | **Wife 1** | **Wife 2** | **Daughter 1** | **Daughter 2** |
|---|---|---|---|---|
| 1 | Parvati | | Krushna Sohani | |
| 2 | Venu | | | |
| 3 | Anandi | | | |
| 4 | | | | |
| 5 | | | | |
| 6 | Sushila Palnitkar | | Kumud | Sumati |
| 7 | Uma (Malati Vaidya) | | | |
| 8 | Priyanka (Charulata Joshi) | | Prajakta | |
| 9 | Shakuntala Gokhale | | Shubhangi Deodhar | Sucheta |
| 10 | Shashikala Datar | | Archana (Shubhangi Kelkar) | Aarati |
| 11 | Laxmi | | | |

आणि त्यामधून आपण आपला अनुक्रमांक मिळवू शकता.

आपल्या कुलवृत्ताप्रमाणे नव्वद वंशांच्या नावाच्या फाईल्स आपल्याला सापडतील. सदर फाईलमध्ये पुस्तकातील वंशावळीप्रमाणे खालीलप्रकारे नावे असतील. पहिल्या पिढीतील पहिल्या माणसाचे नाव पहिल्या रकान्यामध्ये व पहिल्या ओळीमध्ये असेल. त्यानंतर त्याच्या मुलांची नावे उजवीकडील रकान्यामध्ये व त्या खालील ओळीमध्ये असतील. हे लिहिताना पहिल्या सभासदाच्या पहिल्या

(पान ११ वर पुढे चालू)

**व्यक्तिगत आर्थिक स्थैर्याचा निकष संस्थेच्या प्रगतीसाठी तितकाच आवश्यक असतो. संस्था आर्थिकदृष्ट्या सुदृढ व्हावी व सर्व सदस्यांच्या सहाय्याने हे उद्दिष्ट साधावे ह्या हेतूने नित्युंदय गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त किमान एकदा देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा !**

## भिडे कुलप्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

### जुलै

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मुकुंद कृष्ण भिडे, बेळगांव | १ |
| २. | सौ. ज्योत्स्ना अरविंद परचुरे | १ |
| ३. | श्री. विवेक वसंत भिडे, रत्नागिरी | २ |
| ४. | श्री. शशिकुमार के. भिडे, पुणे | २ |
| ५. | कु. वैदेही अनिल भिडे, पुणे | ३ |
| ६. | श्री. समीर सुधीर भिडे, ठाणे | ५ |
| ७. | कु. चैताली संजय भिडे, सांगली | ६ |
| ८. | श्री. रामचंद्र काशिनाथ भिडे, कल्याण | ७ |
| ९. | श्री. जयराम भिडे, सोलापूर | ७ |
| १०. | कु. पवनी शार्दुल भिडे, पुणे | ७ |
| ११. | श्री. विमल रघुनाथ घाणेकर, पुणे | ८ |
| १२. | श्री अरुण महादेव भिडे, नाशिक | ११ |
| १३. | चि. अर्जुन विक्रम भिडे, पुणे | १३ |
| १४. | श्री. वि. कृ. भिडे, नाशिक | १४ |
| १५. | श्री. वसंत सदाशिव भिडे, बोरिवली | १५ |
| १६. | सौ. अंजली कुलकर्णी, मुंबई | १५ |
| १७. | सौ. सुधा दत्तात्रय भिडे | १५ |
| १८. | सौ. सुनंदा दिलीप भिडे, मुंबई | १६ |
| १९. | श्री. वासुदेव परशुराम भिडे, डोंबिवली | १७ |
| २०. | श्री. अनिल वामन भिडे, पुणे | १७ |
| २१. | श्री. अशोक पुरुषोत्तम भिडे, पनवेल | २० |
| २२. | सौ. अस्मिता प्रवीण भिडे, गोवा | २२ |
| २३. | श्री. प्रभाकर शंकर भिडे, डोंबिवली | २२ |
| २४. | कु. दीपांकिता सुनिल भिडे, पुणे | २३ |
| २५. | श्री. बळवंत भिडे, अंमळनेर | २३ |
| २६. | श्री. अरविंद विद्याधर भिडे, पुणे | २३ |
| २७. | श्री. विनय विष्णू भिडे, पुणे | २४ |
| २८. | चि. कपिल गणेश भिडे, पुणे | २५ |
| २९. | सौ. सुजाता विजय भिडे, सांगली | २६ |
| ३०. | सौ. स्मिता सतिश भिडे, मुंबई | २७ |
| ३१. | सौ. स्मिता नरेंद्र भिडे, ठाणे | २७ |
| ३२. | श्री. शंकर त्रिंबक भिडे, पुणे | २८ |
| ३३. | श्री. शंतनु शैलेश भिडे, सांगली | २८ |
| ३४. | श्री. श्रेयस श्रीकृष्ण भिडे, मालाड | ३० |
| ३५. | सौ. अनुराधा अविनाश भिडे, मिरज | ३० |
| ३६. | सौ. आरती विक्रांत भिडे, पुणे | ३० |

### ऑगस्ट

| | | |
|---|---|---|
| १. | सौ. मीरा मधुकर भिडे, गुजराथ | ०३ |
| २. | चि. वरदा ओंकार जोशी, पुणे | ०४ |
| ३. | कु. सुबोध श्रीकांत भिडे, रोहा | ०६ |
| ४. | श्री. श्रीकृष्ण रघुनाथ भिडे, पुणे | ०६ |
| ५. | सौ. योगिनी माधव भिडे, पुणे | ०७ |
| ६. | सौ. स्नेहल सुनिल भिडे, पुणे | ०७ |
| ७. | चिं. ओंकार मिलिंद भिडे, पुणे | १० |
| ८. | सौ. शिल्पा महेश जोशी, मुंबई | ११ |
| ९. | श्री. अमित दिलीप भिडे, पुणे | १२ |
| १०. | श्री. राजेंद्र महादेव भिडे, दादर | १३ |
| ११. | श्री. निळकंठ भिडे, नाशिक | १३ |
| १२. | सौ. प्रसन्ना सुभाषचंद्र भिडे, पुणे | १४ |
| १३. | सौ. ऋता कौस्तुभ जोशी ठाणे | १५ |
| १४. | ले.क. सुनिल वासुदेव भिडे, पुणे | १५ |
| १५. | श्री. आशिष गोविंद भिडे, कल्याण | १५ |
| १६. | श्री. प्रशांत सदानंद भिडे, सातारा | १६ |
| १७. | श्री. मिलींद पुरुषोत्तम भिडे, पुणे | १८ |
| १८. | श्री. अमित सुभाष भिडे, मालाड | १८ |
| १९. | डॉ. संदीप दत्तात्रय भिडे, गुजराथ | १९ |
| २०. | श्री. प्रणव प्रसाद भिडे, पुणे | २० |
| २१. | कु. मधुरा मिलींद भिडे, बडनेरा | २० |
| २२. | ॲड. वृंदा योगेशचंद्र भिडे, पुणे | २० |
| २३. | सौ. वंदना विवेक भिडे, दिल्ली | २१ |
| २४. | श्री. माधव पुरुषोत्तम भिडे, पुणे | २१ |
| २५. | सौ. सुजाता प्रदीप भिडे, पुणे | २१ |
| २६. | सौ. विद्या विश्वनाथ भिडे, पुणे | २२ |
| २७. | चि. अनय शुभानन भिडे, | २२ |
| २८. | डॉ. प्रमोद रामकृष्ण भिडे, डिचोली | २२ |
| २९. | सौ. गौरी प्रदीप भिडे, डोंबिवली | २३ |
| ३०. | श्री. निलेश अशोक भिडे, पनवेल | २६ |
| ३१. | श्री. विवेक विजय भिडे, दिल्ली | २६ |
| ३२. | श्री. सुकृत सुभाष भिडे, सांगली | २६ |
| ३३. | श्री. नवीन वसंत भिडे, इंदौर | २६ |
| ३४. | श्री. विनायक सखाराम भिडे, डोंबिवली | २७ |
| ३५. | श्री. विजय रघुनाथ भिडे, ठाणे | २८ |
| ३६. | सौ. सुचिता आशिष भिडे, भोपाळ | २८ |
| ३७. | सौ. शर्वरी शिरीष शेवाळकर, पुणे | ३० |
| ३८. | श्री. गोपाळ अनंत भिडे, किहीम | ३१ |
| ३९. | श्री. गोविंद काशिनाथ भिडे, सोलापूर | ३१ |

### सप्टेंबर

| | | |
|---|---|---|
| १. | कु. सुरभी राजेंद्र भिडे, डोंबिवली | १ |
| २. | श्री. केदार प्रभाकर भिडे, डोंबिवली | २ |
| ३. | श्री. अनंत हरी भिडे, मालाड | २ |
| ४. | श्री. प्रसाद वसंत भिडे, ठाणे | ३ |
| ५. | सौ. वैजयंती रामचंद्र भिडे, कल्याण | ३ |
| ६. | कु. विश्वेश मुकुंद भिडे, बेळगाव | ४ |
| ७. | सौ. माधवी सारंग भिडे, सांगली | ४ |
| ८. | आर्या चारुदत्त भिडे, माभळे | ६ |
| ९. | श्रीमती संध्या त्रिंबक भिडे, पुणे | ७ |
| १०. | श्रीमती आरती अनंत भिडे, चिपळूण | ७ |
| ११. | मनश्री मंदार भिडे, चिपळूण | ८ |
| १२. | श्री. प्रसाद प्रमोद भिडे, पुणे | ८ |
| १३. | सौ. अनुराधा गोविंद भिडे, सोलापूर | ९ |
| १४. | कु. बागेश्री अविनाश भिडे, पुणे | १० |
| १५. | सौ. अनघा अमित पटवर्धन, बदलापूर | १० |
| १६. | श्रीमती शशी मुरलीधर घुले, पुणे | ११ |
| १७. | श्री. प्रवीण भिकाजी भिडे, गोवा | १३ |
| १८. | सौ. मानसी चारुदत्त भिडे, माभळे | १४ |
| १९. | सौ. हर्षदा व्ही. भिडे, रायगड | १५ |
| २०. | श्री. आनंद भिडे, मुंबई | १६ |
| २१. | सौ. लता नारायण भिडे, जबलपूर | १६ |
| २२. | श्री. विजय अनंत भिडे, ठाणे | १७ |
| २३. | सौ. कल्पना विनायक भिडे, धुळे | १८ |
| २४. | कु. प्रसाद केदार भिडे, डोंबिवली | १८ |
| २५. | श्री. विनायक विश्वनाथ भिडे, पुणे | १८ |
| २६. | श्री. सतीश दत्तात्रय भिडे, पुणे | २० |
| २७. | कु. बिल्वा अमित भिडे, पुणे | २१ |
| २८. | सौ. रेणुका केदार भिडे, पुणे | २२ |
| २९. | कु. गौरी विनोद भिडे, औरंगाबाद | २२ |
| ३०. | चि. जयराज विनोद भिडे, औरंगाबाद | २२ |
| ३१. | श्रीमती वैशाली विलास भिडे, हैद्राबाद | २५ |
| ३२. | कॅ. विवेक प्रभाकर भिडे, मुंबई | २६ |
| ३३. | कु. सारंग संतोष भिडे, ठाणे | २६ |
| ३४. | श्री. चैतन्य भिडे, नाशिक | २६ |
| ३५. | श्री. रोहित विजय भिडे, ठाणे | २७ |
| ३६. | श्री. हेरंब प्रसाद भिडे, माभळे | २८ |
| ३७. | सौ. अपर्णा सुहास भिडे, सातारा | २९ |
| ३८. | श्री. सुधीर गणेश भिडे, ठाणे | २९ |
| ३९. | श्री. बल्लाळ श्रीधर भिडे, चिपळूण | २९ |
| ४०. | सौ. मानसी विक्रम भिडे, पुणे | ३० |

मुलाच्या पुढील सर्व पिढ्यांच्या मुलांची नावे लिहिल्यानंतरच, पहिल्या पिढीतील दुसऱ्या मुलाचे नाव दुसऱ्या रकान्यामध्ये लिहिले आहे. पुरुष सभासदांप्रमाणे बायको आणि मुलींचे आयडी साईटवरील फाईलमध्ये असतील.

प्रत्येक सभासदाला एक ओळ राखीव केलेली आहे. पहिल्या रकान्यामध्ये पहिली पिढी त्यानंतर दुसरी, तिसरी असे करत त्या वंशाच्या सर्व पुरुष सभासदांच्या नावांनंतर त्या पुरुष सभासदाचे लग्न झाले असल्यास त्याच्या बायकोचे व मुलींची नावे पुढील रकान्यामध्ये आहेत. यादीमध्ये प्रत्येक सभासदाच्या पुरुष अथवा स्त्री नावाच्या डावीकडे त्या प्रत्येक सभासदाचा अनुक्रमांक दिला आहे व प्रत्येक ओळीमध्ये पहिल्या रकान्यात संदर्भासाठी पुस्तकातील पान क्रमांक दिला आहे.

**आपल्या माहितीसाठी एका वंशाचे उदाहरण पुढीलप्रमाणे -**

वरील वंशामध्ये माधव (पिढी १) हे पहिल्या पिढीमधील सभासद आहेत. त्यांचा सभासद अनुक्रमांक १०४०९४ आहे. त्यांना दोन मुलगे १) बळवंत (पिढी २-१०४०९५) आणि २) श्रीपाद (पिढी २ - १०४०९६). त्यापैकी बळवंत यांचा पहिला मुलगा नरहरी (पिढी ३). त्याचा मुलगा श्याम (पिढी ४) त्याचा मुलगा अनिल (पिढी ५). अनिलचे नाव झाल्यावर बळवंत यांचा दुसरा मुलगा शंकर (पिढी ३) लिहिला आहे. त्यानंतर पिढी ५ पर्यंत आणि त्यांच्या नंतर बाकी पिढ्या लिहिल्या जातात. टेबल २ प्रमाणे बायको आणि मुलींची नावे त्याच ओळीत लिहिली जातात. ह्या फाईलमध्ये एका ओळीत बसत नव्हते म्हणून खाली दाखवले आहे. वरील वंशाची माहिती कुलवत्तामध्ये पान क्रमांक ४९३ वर आहे.

आता आपल्याला आपल्या प्रत्येक सभासदाची संपूर्ण माहिती त्या डेटामध्ये भरावयाची आहे. त्याकरिता आपल्या सर्वांचे सहकार्य खूप महत्त्वाचे आहे. आपण आपली माहिती व आपल्या परिवारातील सर्व सभासदांची माहिती प्रत्येक सभासदाच्या अनुक्रमांकासह पाठवायची आहे. त्याकरिता आपल्याला एक "xls" फाईल, वरील साईटवर दिली जाईल. त्या फाईलमधील रकान्यांमध्ये भरून पाठवायची आहे आणि आपल्या ओळखीच्या ज्या भिडे मंडळींनी दिली नसेल त्यांना पाठविण्यास सांगावे. तसेच ज्यांची नावे कुलवृत्तामध्ये दिली नव्हती ती आता द्यायची आहेत. त्यासाठी प्रत्येकाने आपल्या वडिलांचा अनुक्रमांक देणे अनिवार्य आहे. तो न दिल्यास आपली माहिती संगणकीय कुलवृत्तामध्ये संकलित करणे शक्य नाही.

---

# साद देती हिमशिखरे

**- श्रीमती उज्ज्वला बा. साठे, पुणे**



श्री. विश्वनाथ भिडे यांना हिमशिखरांचे प्रचंड आकर्षण ! वयाच्या ४५ व्या वर्षापासून त्यांनी हिमालयात सुमारे १५ ट्रेक्स केले. त्या निसर्गसौंदर्याचा मनमुराद आनंद घेत चालणे तर ओघाने आलेच. त्याशिवाय पर्वतारोहण, दोराच्या साहाय्याने कडे चढणे, दऱ्या पार करणे अशा साहसी प्रकारांतही त्यांचा सहभाग होता. क्वचित प्रसंगी हिमवादळे, कडे कोसळणे, सहकाऱ्यांची तब्येत बिघडणे अशा प्रसंगांचे वेळी सुरक्षिततेचा विचार करून माघार घ्यायचे प्रसंगही आले. हिमालयातील खळाळणाऱ्या नद्यांमध्ये 'राफ्टिंग' करायचा अनुभवही त्यांनी घेतला. शिवाय पॅरा ग्लायडिंग, पॅरासेलिंगही केले. सह्याद्रीतही अनेक मोहिमा राबविल्या. विशेष म्हणजे दर शनिवार-रविवार 'सिंहगड वारी.' बहुतेक सर्व बाजूंनी दिवसा व रात्री सिंहगड चढणे ही त्यांची विशेष आवड. सत्तरीच्या जवळपास असताना गुडघेदुखीचा त्रास जाणवू लागला. त्यावर उपाय, एक प्रकारचा व्यायाम म्हणून त्यांनी सायकलिंग सुरू केले. आज ते ७४ वर्षांचे आहेत. मागील दिवाळीच्या सुमारास ते सायकलवरून नागपूरला जाऊन आले. लगेच ख्रिसमसमध्ये गोव्यात तर आजच्या कार्यक्रमाचे आधी दोनच दिवस पौर्णिमेच्या रात्री कात्रज ते सिंहगड असा ५-६ तासांचा ट्रेक त्यांनी केला आणि आता सायकलने नर्मदा परिक्रमा करण्याचा संकल्प आहे. श्री. विश्वनाथ भिडे स्वतःबद्दल कधीही, कुठेही बोलत नाहीत. त्यांच्या पत्नी सौ. अंजलीताईंनी या कार्यक्रमाचे निमित्ताने मुलाखतीद्वारे त्यांना बोलते केले. मुलाखतीचे शेवटी श्रोत्यांच्या प्रश्नांना श्री. भिडे यांनी समर्पक उत्तरे दिली. एक प्रश्न सौ. अंजलीताईंनाच विचारण्यात आला. त्याचा आशय असा होता की त्यांचे मिस्टर सतत त्यांच्या ट्रेकच्या हॉबीत दंग होते. दर शनिवार-रविवार सिंहगड वारी करीत होते. अशा वेळी पत्नी म्हणून त्यांची चिडचिड होत असेल, काही वाद होत असतील, यावर सौ. अंजलीताईंनी काही भाष्य करावे. कार्यक्रमातील या शेवटच्या प्रश्नाला अत्यंत चपखल, प्रसंगोचित पण तरीही सुरेल उत्तर सौ. अंजलीताईंनी एका नाट्यगीतातून दिले. 'ये झणिं येरे येरे माघारी, क्षणभरी वळुनी बघ मम नयनी, मूर्ति आपुली...

# महिला समिती

**१) सौ. सुप्रिया प्रशांत भिडे, सातारा.**



वय ५८. महिला समिती प्रमुख म्हणून प्रथमच निवड. शिक्षण बी.कॉम., गृहिणी, भिडे अ‍ॅण्ड असोसिएटस्‌ पार्टनर, सातारा येथील रानवारा संस्थेची उपाध्यक्षा, जागृती महिला मंडळ, सातारा या संस्थेमार्फत गेली २७ वर्षे मंगळागौरी खेळाचे देशात, विदेशात व महाराष्ट्रात अनेक ठिकाणी सादरीकरण. अध्यात्म व योगाची विशेष आवड.

**२) सौ. स्नेहल विजय भिडे, ठाणे**



वय ५६. शिक्षण बी.ए. (मराठी) बालवाडी प्रशिक्षण पूर्ण, ज्योतिष अभ्यासक्रम (पारंपरिक) व्यवसाय, ज्योतिष मार्गदर्शक व समुपदेशक. कवयित्री व लेखिका. अनेक लेख व कविता आम्ही भिडे अंकात असतात. तसेच आम्ही भिडे अंकाच्या संपादक मंडळात सहभागी आहेत. महिला समितीत पुन्हा निवड.

**३) सौ. अर्चना प्रसन्न जोगळेकर, रत्नागिरी**



वय ४८. शिक्षण बी. फार्मसी. रत्नागिरी येथे औषधाचे दुकान आहे. भिडे संमेलन व सांस्कृतिक कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग. संगीत, नाटक ह्याची आवड, पाककलेमध्ये रुची आहे. महिला समितीत पुन्हा निवड.

**४) सौ. अंजली हेमंत कुलकर्णी (भिडे), मालाड, मुंबई**



वय ५५. शिक्षण बी.ए. ज्योतिष विशारद (पारंपरिक), नक्षत्र ज्योतिष अलंकार (के.पी.), मंत्र भास्कर, वास्तुशास्त्र, टॅरो कार्ड रिडिंग, रेकी, कथ्थक शिक्षण पूर्ण. व्यवसाय वास्तू सल्लागार, ज्योतिष मार्गदर्शन. भिडे प्रतिष्ठानच्या संमेलनात व सांस्कृतिक कार्यक्रमात विशेष सहभाग. अभिनयाची आवड असल्यामुळे मराठी टी.व्ही. सिरियलमध्ये पदार्पण. महिला समितीत पुन्हा निवड.

**५) सौ. मेघना आशिष भिडे, पुणे.**



वय ४३. शिक्षण एम.कॉम., खाजगी कंपनीची अकाऊंटस्‌ टॅलीची कामे करून देतात. भिडे प्रतिष्ठानच्या संमेलन व इतर कार्यात उत्स्फूर्त सहभाग, तसेच भिडे प्रतिष्ठानच्या स्वीकृत सदस्य म्हणून सलग २ वर्षे कार्यरत. महिला समितीत पुन्हा निवड.

**६ सौ. मधुरा महेश भिडे, पनवेल**



वय ५०. शिक्षण बी.कॉम., **CATD** पनवेल येथे शाळेत नोकरी करतात. पनवेलच्या भिडे संमेलनात सूत्रसंचालनाची जबाबदारी तसेच संमेलन नियोजनात उत्स्फूर्त सहभाग. चित्रकला व हस्तकलेची विशेष आवड. महिला समितीत प्रथमच सहभाग.

**७) सौ. संपदा राजेंद्र भिडे, दादर, मुंबई.**



वय ४५, शिक्षण बी.कॉम., ब्यूटी पार्लरचा व्यवसाय. प्रतिष्ठानची महिला विश्वस्त म्हणून कार्यरत. प्रतिष्ठानशी निगडित धर्मादाय कार्यालय संबंधित कामे करतात. बी.एस.एम. दादर ह्या संस्थेच्या संयुक्त कार्यवाह म्हणून कार्यरत. २०१३ पासून प्रतिष्ठानच्या कामात सक्रिय सहभाग. महिला समितीत पुन्हा निवड.

**८) सौ. गार्गी मिलींद भिडे, पनवेल.**



वय ५२. शिक्षण बी.एस्सी. (स्टॅटिस्टीक्स). एम.बी.ए. एल.आय.सी. पनवेल येथे गेली ३० वर्षे नोकरी. पनवेल भिडे संमेलनात उत्स्फूर्त व सक्रिय सहभाग. आम्ही भिडे अंकात लेखन करतात. सामाजिक कार्यामध्ये विशेष आवड. महिला समितीत प्रथमच सहभाग.

## भिडे विद्यार्थी-विद्यार्थिनींचे घवघवीत यशासाठी हार्दिक अभिनंदन !



**कु. करुणा दीपक भिडे**
डोंबिवली
इ. १२वी : ६०० पैकी
४५० गुण
गुण टक्केवारी : ७५%



**कु. धनश्री सचिन भिडे**
तळेगाव दाभाडे, पुणे
इ. १२वी ; ५०० पैकी
५३५ गुण
गुण टक्केवारी : ८९.१७%



**कु. प्रिशा प्रशांत भिडे**
दादर, मुंबई
इ. १०वी : ५०० पैकी
३७५ गुण
गुण टक्केवारी : ७५%



**कु. नेहा जितेंद्र गोखले**
पुणे
इ. १०वी : ५०० पैकी
४४३ गुण
गुण टक्केवारी : ८८.६०%



**कु. नेहा मुकुंद भिडे**
सांगली
इ. १०वी : ५०० पैकी
४८५ गुण
गुण टक्केवारी : ९७%

## सद्गुरुमहिमा

ऐसा सद्गुरुमहिमा। सुखाची परिसीमा।
पुनवेचा चंद्रमा। अमृत वर्षवी जैसा ॥१॥
सदैव सद्गुरू माझे जवळ। ऐसी जाणिव धरिता केवळ।
पीडा संकट दुःखे सकळ। दूर होती क्षणमात्रे ॥२॥
सद्गुरुशी आठवाल। हृदयकमळी साठवाल।
मनभ्रमर गुंजेल। सभोवताली॥३॥
असे हा कल्पतरू। ज्ञानाचा भांडारु।
जीवनवेलीचा आधारु। सद्गुरू माझा ॥४॥
महिमा त्याचा अपार। प्रेमदयेचा सागर।
नेईल पैलपार। जीवन नौका॥५॥
लाभता हा परिस। स्पर्शून जाईल तनमनास।
तेजाळुनी कणाकणास। सुवर्णकांती देईल ॥६॥
नको संसाराची चिंता। तोच कर्ता-करविता।
भवभय, चिंता, व्यथा। आता कैचि उरेल॥७॥
सरावे माझे 'मी'पण। ध्यास हाच रात्रंदिन।
नयनापुढती सद्गरू चरण। दुजे काही नुरावे ॥८॥
ॐ सद्गुरू मालती आई। नमन माझे तुमच्या पायी।
वसावे नित मम हृदयी। न्यावे मजसि मोक्षपदा ॥९॥

- सौ. मंगल भिडे-राजवाडे, सांगली

## नवी दिशा

नव्याने पुन्हा वाट चालावयाची,
पुन्हा काही स्वप्ने खुणावती मला,
वाटते बघावी ही पुन्हा मातृभूमी,
तसे वाटे भेटावे, संत साधू पुन्हा !
नवे काही करतो, आता वेळ आहे,
चांगले वाचणे सुरू असतेच ना,
पहावीत काही सिनेनाटके ही,
ऐकण्यासाठी संगीत आहेच ना !
नव्या या पिढीला नीट समजून घ्यावे,
किती वेगळे विश्व विस्मयांचे वाटे मला,
कुठे ताण नाही, कधी शांत नाही,
तरी छान जगण्याची त्यांची कला !
कळतेच आहे, जग बदलले किती,
या नव्याने उमटतात काही खुणा,
कसे मी जगावे, नवे हास्य ओठी,
सतत आहे पाठी, कृष्ण माझा म्हणा !

- हेमंत भिडे, जळगांव

## चिन्ह...

शाळेत येता गुरुजी
पाढे शिकवू लागले
गणिताचे सगळे अंक
डोक्यात फिरू लागले
गुरुजी मारतात छडी
जेव्हा गणितात होते चुकी
कितीही वेळा भागलं
तरी शून्यच उरते बाकी
एक गणित सोडवताना
गुरुजींचा भरतो फळा
गणिताचे पुस्तक उघडले
तरी चिन्हांचा भरतो मेळा
बेरीज वजाबाकी सोपी
कठीण काही नाही
अख्खं वर्ष संपलं
तरी भरली नाही वही
सुखाला दुःखाने गुणून
हिशोब नको करायला
हव्या आयुष्यातल्या सुख-दुःखाच्या
बेरजा एकमेकात वजा करायला

- करुणा भिडे, डोंबिवली

## अनोखी वारी

आली आषाढीची सय
मन चालले वारीत
दिंड्या पताका हातात
वारकरी येती गावात ॥१॥
टाळ मृदुंगाचा आवाज
घुमू लागले कानात
रस्ते जाती फुलून
नाम घोष गजरात ॥२॥
होऊन मायेतून बाजूला
निघाले वारकरी वारीला
बारीत रमता संसार सुटतो
विठ्ठल नामी माणूस रंगतो ॥३॥
एकतरी ओवी अनुभवावी
तशी एक तरी वारी करावी
तहान-भूक हरपून वारीत नाचतो
होईल दर्शन विठोबाचे ॥४॥
लाखो भक्तांची वारी
महामारीने चुकवली
हिरमुसले सारे भक्त
अशी वेळ का बरे आली ॥५॥
ज्ञानोबा, तुकोबा विमानी बैसलें
निघाले भेटाया पांडुरंगा
विठुची नजर भोवती भिरभिरे
आपुले भक्त शोधाया ॥६॥

- श्रीमती उज्ज्वला साठे, पुणे

## जीवन मार्ग


दिसेल सुबक
सत्कर्माची नक्षी
विचारांचा पक्षी
उडावा आता
आपणच लिहू
जीवनाचा धडा
संकटाचा सडा
पडेल कसा ?
कसा ओळखावा
मनुष्य चांगला
कसाही वागला
या स्वार्थी जगी
कठीण कठीण
जगाचा हा स्वर्ग
आपुला हा मार्ग
सत्याचा हवा
धन्य असा राम
ज्याचा तो वनवास
होता हा विश्वास
बंधू भरताचा
बांधूया गाठोडे
अन्य विचारांचे
मनात देवाचे
मान घेऊया

- करुणा भिडे, डोंबिवली

## पाऊस

बदललं एकदम सारं,
तो एकदा येऊन गेला,
तगमग थांबली सारी,
तो चिंब भिजवून गेला
त्याच्या येण्याकडे बघा
अनेकांचे डोळे आहेत
तो येईल केव्हा याचे
कैक अंदाज खोटे आहेत
नेहमी हुलकावण्या देत
तो असाच अवेळी येतो
बरसतो कधी कोसळतो
गंधी मातीला देऊन जातो
त्याच्या येण्याजाण्यालाही
काहीच काळवेळ नाही
कधी सुसाट वाऱ्यासह
कधी विजेस घेऊन येई
त्याच्यामुळे चार महिने
खूप आनंदात जातात
श्रावण, भाद्रपद, अश्विन
देवदेवतांचे सण येतात
हिरवे सुंदर सगळे दिसते
डोंगर सगळे सुंदर दिसतात
शेते, राने, माळराने हिरवी
डोळे बघून आनंदी होतात
आताच बघा ही सुरुवात
तो येईल बघा पुन्हा पुन्हा
मुक्तपणे स्वागत करूया त्याचे
मनसोक्त भिजा, नाही गुन्हा

- हेमंत भिडे, जळगांव



# डॉ. विष्णू गणेश भिडे :भौतिकशास्त्रज्ञ, विज्ञानप्रसारक

**(जन्मदिन - ८ ऑगस्ट, १९२५)** **- डॉ. पंडित विद्यासागर**

घनस्थिती भौतिकी आणि सौरऊर्जा या क्षेत्रांतील तज्ज्ञ म्हणून मान्यता पावलेले डॉ. विष्णू गणेश भिडे यांचा जन्म दर्यापूर येथे झाला. नागपूर विद्यापीठाची भौतिकशास्त्रातील एम.एस्सी. पदवी त्यांनी प्रथम क्रमांकाने, अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्यांसह पटकावली आणि लगेच तेथेच ते व्याख्याते म्हणून रुजू झाले. त्यांच्या 'इलेक्ट्रीकल डिस्चार्जेस' या विषयावरील प्रबंधास नागपूर विद्यापीठाने १९५३ साली डॉक्टरेट दिली. 'ऑप्टिकल ॲण्ड इंटर फेरोमेटिक स्टडिज ऑफ सम आस्पेक्टस् ऑफ क्रिस्टल ग्रोथ' या विषयावरील त्यांच्या प्रबंधावर लंडन विद्यापीठाची डॉक्टरेट त्यांनी १९५६ साली मिळवली. पुढे मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये प्राध्यापक व नंतर विभागप्रमुख या नात्याने ते काम पाहू लागले. इंडियन नॅशनल सायन्स ॲकॅडमीचे फेलो, इंडियन फिजिक्स असोसिएशनचे उपाध्यक्ष, १९७१ साली बंगळुरू येथील इंडियन सायन्स काँग्रेसच्या भौतिकशास्त्र विभागाचे अध्यक्ष अशी अनेक मानाची पदे त्यांनी भूषवली आहेत.

१९६६ साली ते दिल्लीच्या नॅशनल फिजिकल लॅबोरेटरीत उपसंचालक या नात्याने काम पाहू लागले. मध्ये काही वर्षे केंद्रीय मंत्रिमंडळाच्या शास्त्रीय सल्लागार समितीचे सचिव म्हणून त्यांनी जबाबदारी स्वीकारली होती. घनस्थिती भौतिकीच्या क्रिस्टल ग्रोथ, फेरो इलेक्ट्रिसिटी, फेरोमॅग्नेटिझम, लिक्विड क्रिस्टल, मॉसबॉअर आणि एक्स-रे स्पेक्ट्रोस्कोपी वगैरे बऱ्याच शाखांत त्यांनी संशोधन केलेले आहे. शंभरहून अधिक संशोधनपर निबंध आणि अर्धे शतक पीएच.डी. विद्यार्थी त्यांच्या कर्तृत्वाची ग्वाही देत आहेत. इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी, अमेरिका, झेकोस्लोव्हाकिया, रशिया, इस्रायल, जपान इत्यादी प्रगत देशांनीही त्यांना वेळोवेळी सन्मानाने बोलावून त्यांच्या ज्ञानाचा लाभ घेतलेला आहे. कित्येक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील वैज्ञानिक संस्थांचे ते पदाधिकारी होते. १९७४ साली ते सौरऊर्जेसंबंधी एका राष्ट्रीय समितीचे कार्याध्यक्ष होते. त्या अधिकारात त्यांनी युनोला भेट दिली. 'यू.एन. इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट ऑर्गनायझेशन' या संस्थेचेही ते उपाध्यक्ष होते. सौरऊर्जेवर एक उत्तम गट त्यांनी तयार केला आहे. या सौरऊर्जेचा खेड्यांच्या विकासासाठी कसा उपयोग करता येईल, या संबंधीचे संशोधन त्यांनी चालू केले. पुणे विद्यापीठामध्ये ऊर्जा विभाग स्थापन करण्याची जबाबदारी त्यांनी स्वीकारली. या विभागाच्या भरभराटीत त्यांचे योगदान अतिशय महत्त्वाचे आहे. पुणे विद्यापीठात आल्यानंतर त्यांच्या कारकीर्दीत चांगले निर्णय घेतले गेले. प्रा. वि. ग. भिडे यांनी आपल्या प्राविण्याचा ठसा सर्वत्र उमटविला. पुणे विद्यापीठातील अनेक तरुण संशोधकांना त्यांनी प्रोत्साहन दिले. त्यानंतर प्रा. वि. ग. भिडे यांना पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूपदी आरूढ होण्याची संधी मिळाली. या संधीचा त्यांनी पुरेपूर फायदा करून घेतला. पुणे विद्यापीठाचा विकास घडवून आणण्यासाठी त्यांनी अनेक नवीन योजना अंमलात आणल्या. संशोधनाला चालना मिळावी यासाठी त्यांनी 'आयुका' (इंटर युनिव्हर्सिटी सेंटर ऑफ ॲस्ट्रॉनॉमी ॲण्ड ॲस्ट्रॉफिजिक्स) तसेच एन.सी.आर.ए. (नॅशनल सेंटर फॉर रेडिओ ॲस्ट्रॉनॉमी) यांसारख्या संस्था पुणे विद्यापीठाच्या आवारात आणण्यासाठी पुढाकार घेतला. पुणे विद्यापीठाचे कुलगुरू म्हणून त्यांनी तीन वर्षे काम केले. त्यांच्या कुलगुरूपदाच्या कारकीर्दीमध्ये अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्रश्न खूप मोठ्या प्रमाणात चर्चिले गेले. सरकारी महाविद्यालये व नवीन सरकारमान्य खाजगी महाविद्यालये यांच्यामध्ये असणारा दुवा प्रा. भिडे यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा वापर करून खूप मोठ्या प्रमाणात कमी केला.

कुलगुरू पदावरून निवृत्त झाल्यानंतर प्रा. वि. ग. भिडे यांनी २००० साली इंडियन सायन्स काँग्रेसचे अधिवेशन, पुणे विद्यापीठात भरले.त्या अधिवेशनात मुलांच्या कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी प्रा. सी. एन. राव यांनी प्रा. वि. ग. भिडे यांच्यावर टाकली होती. त्यांनी आपल्या कार्याची दिशा ही विज्ञान प्रसार व विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाची आवड निर्माण करण्याकडे वळवली. या कार्यात त्यांनी स्वतःला पूर्णपणे झोकून दिले. विज्ञान शोधिका स्थापन करण्याची त्यांची कल्पना अभिनव अशीच होती. शालेय व महाविद्यालय स्तरावर विद्यार्थ्यांना विज्ञान हे अत्यंत अयोग्य पद्धतीने शिकवले जाते, याची त्यांना खंत होती. प्रयोगाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विज्ञान शिकता यावे, यासाठी प्रयोगशाळा स्थापन करण्याचा त्यांनी संकल्प केला. 'भारतीय विज्ञान भवन' या संस्थेच्या सहकार्याने त्यांनी हा उपक्रम प्राथमिक स्तरावर सुरू केला. प्रा. वि. ग. भिडे यांना मानणारे शिक्षक, प्राध्यापक, तसेच विज्ञानाची आवड असणाऱ्या व्यक्ती यामध्ये सामील झाल्या. अगदी कमी आर्थिक मदतीत उपक्रम कसे राबवावेत, याची प्रा. वि. ग. भिडे यांना चांगलीच कल्पना होती. किंबहुना त्यांचे याबाबतचे वर्तन हे आदर्श होते. प्रा. वि. ग. भिडे यांच्यासाठी काम करताना कोणीही कधीही पैशाची मागणी करीत नसे. प्रा. वि. ग. भिडे यांचा शब्द खाली पडू द्यायचा नाही, हेच धोरण त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीमध्ये होते. विज्ञान शोधिका त्यांनी अशा प्रकारे चालवून तिचा विकास केला. या प्रयोगासाठी त्यांनी महाराष्ट्र सरकारकडून विनामूल्य जागा मिळवली. याच जागेवर आज विज्ञान शोधिकेची भव्य वास्तू उभी आहे. कार्यमग्न राहणे

हे प्रा. वि. ग. भिडे यांचे वैशिष्ट्य होते. निवृत्तीनंतर त्यांच्या कामाचा झपाटा अधिकच वाढला असे म्हटले तर वावगे ठरू नये. या काळात त्यांनी महाराष्ट्रात व नागपूरमध्ये ठिकठिकाणी अनेक व्याख्याने दिली. यातून त्यांनी 'बाल विज्ञान चळवळी'ची कल्पना पुढे मांडली. महाराष्ट्रात विज्ञान प्रसार करणाऱ्या अनेक संस्था आहेत. परंतु या संस्था स्थानिक पातळीवर त्यांच्या गुणवत्तेप्रमाणे कार्य करतात. या सर्व संस्थांना एकत्रित करून चळवळ निर्माण करावी, असे प्रा. वि. ग. भिडे यांना वाटले. त्यांनी या सर्व संस्थांना एकत्र आणले आणि 'बाल विज्ञान चळवळी'ची स्थापना केली. या चळवळीच्या माध्यमातून त्यांनी अनेक कार्यक्रमांची आखणी केली व ते त्यांनी यशस्वीपणे राबविले. डॉ. अब्दुल कलाम यांनी या कार्यात सहभाग घेतला.

प्रा. वि. ग. भिडे यांच्या या महत्त्वपूर्ण कार्यात प्रा. यशपाल, डॉ. बालसुब्रह्मण्यम, डॉ. जयंत नारळीकर, डॉ. विजय भटकर, डॉ. अशोक कोळस्कर, डॉ. पंडित विद्यासागर या व अशा अनेक गणमान्य व्यक्तींनी सहभाग घेतला. विद्यार्थ्यांसाठी विज्ञानावरील उत्कृष्ट पुस्तके आणावीत, असा त्यांचा मानस होता. त्यातून विज्ञान शोधिका अंतर्गत पुस्तकांची निर्मिती केली गेली. या प्रयोगात अनेक दर्जेदार पुस्तकांची निर्मिती झाली. काही कारणामुळे ही योजना पुढे चालू राहिली नाही, तरी दर्जेदार पुस्तकांच्या निर्मितीचा वस्तुपाठ यामधून घातला गेला.

---

# कर्तव्यभावनेचा भीतीवर विजय

**- सौ. योगिनी मा. भिडे, पुणे**

मला जून २००६ पासून मेनोपॉज आणि व्हर्टिगो (डोक्यात चक्कर करणे) याचा खूपच त्रास सुरू झाला. ह्या त्रासाचाच भाग म्हणून की काय पण मला 'हॉस्पिटल फिअर'चा त्रास सुरू झाला. कोणाला भेटायला हॉस्पिटलमध्ये जायचे म्हटले की मला टेन्शनच यायचे. कारण हॉस्पिटलमध्ये गेल्यावर डोक्यात चक्कर करायची, छातीत धडधडायचे, श्वास अडकल्यासारखे व्हायचे. मनावर इतका ताण यायचा की आपल्यालाच काहीतरी होईल की काय अशी भीती वाटायची. हॉस्पिटलच्या बाहेर आल्यावर त्रास पूर्णपणे नाहीसा व्हायचा. मी मनाला खूप समजवायची की हॉस्पिटल ही अशी जागा आहे की जिथे अनेकांना नवजीवन मिळते. लोकांचे आजार बरे होऊन ते नव्याने छान आयुष्य सुरू करू शकतात. तेव्हा मनावर ताण येण्याचे काहीच कारण नाही. पण मन ऐकायचेच नाही. म्हणजे मी शक्यतो हॉस्पिटलमध्ये जाणे टाळायचीच. पण अगदी जवळचीच व्यक्ती हॉस्पिटलमध्ये ॲडमिट असेल तर मात्र जायची. जाताना त्रास कमी व्हावा म्हणून पुष्पौषधी घेऊन जायची. हॉस्पिटलच्या बाहेर आले की मला अगदी हुश्श व्हायचे.

काहीवेळा मला वाटायचेही की जर आपल्या एखाद्या जवळच्या व्यक्तीलाच काही कारणाने ॲडमिट केले तर आपण कसे काय करू शकू ? आणि आपल्यालाच काही कारणाने ॲडमिट करायची वेळ आली तर ? त्या सुमारास माझ्या सासऱ्यांना किडनीचा त्रास सुरू झाला. त्यांना त्यांचे रिपोर्टस् दाखविण्यासाठी हॉस्पिटलमध्ये न्यायचे होते. मी, माझे दीर आणि सासरे असे तिघांनी सदन कमांड हॉस्पिटलला जाण्याचे ठरले. तेव्हा मात्र मी मनाला ठामपणे सांगितले की आता कोणत्याही प्रकारे आपल्याला हॉस्पिटल फिअरकडे अजिबात लक्ष द्यायचे नाही. कितीही त्रास झाला तरी आपल्या कर्तव्यात आपण कमी पडायचे नाही. अशा प्रकारे मनाला समजावत मी त्यांच्याबरोबर हॉस्पिटलमध्ये गेले. आम्ही डॉक्टरांच्या केबिनमध्ये गेलो. डॉक्टरांशी बोलण्याचे काम दीरच करत होते. मला एकदा थोडे डोक्यात चक्कर केल्यासारखे झाले तेव्हा मी केबिनमधून चटकन बाहेर आले. पण हॉस्पिटलचे काम व्यवस्थित पूर्ण करून आम्ही घरी आलो. त्यानंतर सासऱ्यांना दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये मी इंजक्शन देण्यासाठी घेऊन गेले. तेव्हा बरोबर एक पुस्तक ठेवले. वेटिंगरूममध्ये बसल्यावर मी पुस्तक वाचले. फारसे इकडेतिकडे बघितलेच नाही. इंजेक्शन देण्याचे काम व्यवस्थित पूर्ण करून आम्ही घरी आलो. १३ जानेवारी, २०१४ रोजी सासऱ्यांची तब्येत बिघडल्याने त्यांना पूना हॉस्पिटलच्या आय.सी.यू.मध्ये ॲडमिट केले. मी कोणत्याही प्रकारे आपल्या हॉस्पिटल फिअरकडे अजिबात लक्ष द्यायचे नाही असे माझ्या मनाला ठामपणे परत एकदा सांगितले. मग अगदी धीटपणे मी हॉस्पिटलमध्ये बसायला जाऊ लागले. आय.सी.यू.मध्ये जाऊन सासऱ्यांना चहा देणे, जेवण देणे, आवश्यकतेप्रमाणे डॉक्टरांशी बोलणे ह्या सर्व गोष्टी अगदी मनापासून, निष्ठेने करायला लागले.

आय.सी.यू.त जाताना पाय जड व्हायचे, डोक्यात भिरभिरायचे, पण त्याकडे दुर्लक्ष करून आवश्यकतेनुसार व्हर्टिगोची गोळी, पुष्पौषधी घेऊन मी माझे कर्तव्य यथामती, यथाशक्ती व्यवस्थित करू लागले. एक महिना डॉक्टरांनी, घरच्यांनी खूप प्रयत्न केले. सासऱ्यांनीही अगदी लढाऊप्रमाणे कोणत्याही प्रकारे तक्रार न करता दुखण्याशी झुंज दिली. पण २०१४ मध्ये त्यांचे पहाटे झोपेतच त्यांच्या राहत्या घरी दुःखद निधन झाले. सर्वांनाच खूप दुःख झाले. मी माझ्या मुलीला म्हटलेही की मला या घराशी बांधणारा एक फार मोठा दुवा निखळला. सासऱ्यांच्या निधनाने निर्माण झालेली पोकळी कधीच भरून निघणार नाही. पण ईश्वरकृपेने मी माझ्या मनाच्या शक्तीमुळे माझ्या हॉस्पिटल फिअरवर मात करू शकले. सासऱ्यांप्रती असलेले माझे कर्तव्य माझ्यापरीने चोख बजावले याचे फार मोठे समाधान मला आहे.

आम्ही भिडे अंकास हार्दिक शुभेच्छा !!

# Bhide & Associates

Retainership of GST - Registration, Returns, Audit, Consultany & Other Allied Services

Office : Plot No. 100, Opp. MSEB Sub Station,
Add. : MIDC, Satara, Phone : 02162-240599
Email : psbexconsult@gmail.com
Reg.off : F.No.6, Devika Appt., 15/1, Vyankatpura Peth,
Satara - 415 002. Ph. : 02162-284358

**Shriram A. Kulkarni**
Cell : 9881237931, 7038790066

**Prashant S. Bhide**
Cell : 9423035027, 7776027779

# निवेदन

१) नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानतर्फे भिडे कुलातील गरजू व गुणवंत, तसेच शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थीनींसाठी ''श्री. प्रदीप व डॉ. शिला भिडे शैक्षणिक निधी'' आणि भिडे प्रतिष्ठानचे माजी लेखापरीक्षक श्री. विजयराव व श्री. सुरेशराव भिडे पुरस्कृत शैक्षणिक निधीतून विना परतफेड आर्थिक शिष्यवृत्ती उपलब्ध आहे.

२) नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानतर्फे भिडे कुलातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक निधीतून विनापरतफेड आर्थिक शिष्यवृत्ती उपलब्ध आहे.

त्यासाठी विहीत नमुन्यातील अर्ज **www.bhidekul.in** या वेबसाईटवर शैक्षणिक व आर्थिक मदतीसाठी फॉर्म उपलब्ध आहेत. सदर फॉर्ममध्ये नमूद केल्याप्रमाणे सर्व कागदपत्रे जोडून अर्ज भरून खालील पत्त्यावर पाठवावेत.

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**
**१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन, ए-२०१,**
**पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०**
**मो. ९६२३०१७४४४**

**पत्ता चुकीचा असल्यास अंक खालील पत्त्यावर परत पाठवावेत...**
**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान, द्वारा : ले. क. सुनिल वासुदेव भिडे,**
**१४२६, सदाशिव पेठ, नीलसदन ए-२०१,**
**पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०**

**सायंदैनिक प्राजक्त**

'प्राजक्त' हे पत्र मुद्रक सौ. विनीता प्रफुल्ल डबीर यांनी प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांचेसाठी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६०१२ येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. संपादक : प्रफुल्ल डबीर फोन २५४०४२७

RNI NO. : M-6 (1457) / 70-RNI
Reg. No. KLR 136/21-23 Posted in Kolhapur RMS